# अंतरलहरी



कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई

मे - ऑगस्ट २०१६ वर्ष ९ अंक २ पृष्ठ ८ रु. २/-

## धर्मशील जीवन

**प्रश्नकर्ता:** धर्मशील जीवन म्हणजे काय हे जाणून घ्यायची मला इच्छा आहे. मी मठामधून कित्येक महिने राहिलो आहे. ध्यान केले, शिस्तीत जगलो, खूप वाचनही केले. मी देवळे, चर्च, मशीदी यांना भेटी दिल्या. मी अत्यंत साधेपणाने, निरूपद्रवीपणे, प्राणीमात्रांना व दुखवता जगण्याचा प्रयत्न केला. धर्मशील जीवनासाठी हे पुरेसे नाही का? मी योगधारणा केली. झेनचा अभ्यास केला. आणि कित्येक धर्मपंथांचा पाठपुरावा केला. मी शाकाहारी होतो व आतापण आहे. जगातील विविध भागात मी काही संतांबरोबर जीवन व्यतीत केले. परंतु मला वाटते हे काहीसे खऱ्या गोष्टीला सोडून सभोवतालचेच आहे, म्हणून तुमच्यासाठी धर्मशील जीवन म्हणजे काय ह्याविषयी मला चर्चा करायला आवडेल.

**कृष्णमूर्ती:** एके दिवशी संन्यासी मला भेटायला आला, तो दु:खी होता. तो म्हणाला की त्याने ब्रह्मचर्याची शपथ घेतली होती आणि भिक्षूक बनण्यासाठी जगरहाटी सोडून खेड्यापाड्यांतून फिरला. परंतु त्याची लैंगिक इच्छा एवढी तीव्र होती की एके दिवशी सकाळी त्याने त्याचे लैंगिक इंद्रिय शस्त्रक्रियेने काढून टाकायचे ठरवले. त्यानंतर तो कित्येक महिने वेदना सहन करत होता. पण शेवटी जखम भरली. बऱ्याच वर्षानंतर आपण काय करून बसलोय ह्याचाा त्याच्या डोक्यात प्रकाश पडला; म्हणून तो माझ्याकडे आला, आणि त्या छोट्याशा खोलीत तो मला विचारत होता, की शरीराची अशी काटछाट केल्यावर शरीर तर नाहीच पण आतून मन जाग्यावर आणण्यासाठी तो काय करू शकेल. त्याने हे केले कारण लैंगिक उपभोग हा धर्माच्या विरूद्ध समजला जातो. तो प्रापंचिक, सुखोपभोगाच्या जगातला समजला जातो व कुठल्याही परिस्थितीत खऱ्या संन्याशाने तो टाळायचा असतो. तो म्हणाला, ''आता मी इथे संपूर्ण पराभूत, पुरुषार्थ गमावलेला असा आहे. माझ्या लैंगिक इच्छांच्या विरूद्ध मी खूप धडपडलो आणि शेवटी ही भयंकर गोष्ट घडली. आता मी काय करू? माझी चूक माझ्या लक्षात आली आहे. पण माझी सर्व शक्ती जवळ जवळ संपली आहे, आणि माझ्या आयुष्याचा शेवट मी अंधारात करतो आहे असे दिसते.'' त्याने माझा हात पकडला व आम्ही काही काळ शांत बसलो.

हे धर्मशील जीवन आहे का? सुख, सौंदर्य नाकारणे हा धर्मशील जीवनाकडे नेण्याचा मार्ग आहे का? हे आकाश, ह्या टेकड्या, ही मनुष्याकृती ह्यांचे सौंदर्य नाकारणे म्हणजे धर्माकडे नेणारी वाट आहे का? परंतु बरेच साधू, संत असेच मानतात. ते श्रद्धेमुळे स्वत:चे हाल करतात. एखादा यातनेत असेल, पिळवटून निघालेला असेल, विरूप झालेला असेल तर त्याला धार्मिक जीवन म्हणजे काय ते कळेल का? तरीही सर्व धर्मांचे सांगणे आहे की सत्याकडे, देवांकडे किंवा त्याला काय नाव द्यायचे असेल ते – त्याकडे जाण्याचा एकमेव मार्ग म्हणजे यातना, विस्मयता. ते सर्व, ज्याला धार्मिक किंवा अध्यात्मिक जीवन म्हणतात आणि ज्याला ऐहिक जीवन म्हणतात, त्यात फरक करतात.

जो माणूस फक्त सुखासाठी जगतो व केव्हातरी दु:ख, पावित्र्य ह्यासारख्या गोष्टींचा क्षणभर प्रकाश पडतो, ज्याचे जीवन सुख व मनोरंजनासाठी वाहिलेले आहे, तो अर्थातच प्रापंचिक आहे. एखादा हुशार, अभ्यासू असेल. त्याचे आयुष्य स्वत:च्या किंवा दुसऱ्याच्या विचाराने भारावलेले असेल तरी तो ऐहिकच आहे. एखाद्या माणसाला नैसर्गिक गुणाची देणगी असेल व तो ती स्वत:च्या व समाजाच्या भल्यासाठी वापरत असेल आणि त्या अंगभूत गुणांच्या परिपूर्तीत प्रसिद्धी मिळवत असेल असा माणूस पण व्यवहारिकच आहे आणि देऊळ, चर्च, मशिदीत जाऊन प्रार्थना करणे, हे पण ऐहिकच आहे. तुम्ही पूर्वग्रहदूषित, मतांध असता व त्यात असलेल्या पाशवीपणाचे तुम्हाला भान नसते. देशभक्ती, राष्ट्रवाद, ध्येयवाद. हे सर्व प्रापंचिक आहेत. जो माणूस स्वत:ला मठामध्ये कोंडून घेतो, ठराविक वेळी हातात पुस्तक घेऊन उठतो, पठण करतो, प्रार्थना करतो, तो पण संसारी आहे आणि जो माणूस, सुधारक किंवा मिशनरी म्हणून हिताची कामे करतो तो सुद्धा ही काळजी वाहण्यात राजकारण्यासारखाच असतो. धर्मशील जीवन आणि जग ह्यात फरक करणे हे ऐहिकपणाचे प्रमुख लक्षण आहे. साधू, संन्यासी, सुधारक ह्यांची मने, स्वत:ला सुखदायक गोष्टींमध्ये रस घेणाऱ्यांच्या मनापेक्षा वेगळी नाहीत.

म्हणून जीवन ऐहिक व पारलौकिक असे विभाजन न करणे महत्त्वाचे आहे. लौकिक व धार्मिक असा फरक न करणे महत्त्वाचे आहे. ह्या वस्तूंच्या जगाशिवाय, ह्या भौतिक जगाशिवाय आपण इथे असणार नाही. हे सुंदर आकाश. टेकडीवरील तो एकच वृक्ष. ती तिकडून जाणारी स्त्री, तो घोड्यावरून जाणारा पुरुष ह्या सर्वांशिवाय जीवन शक्य नाही. आम्हाला संपूर्ण जीवनाचा विचार करायचा आहे. धार्मिक समजल्या जाणाऱ्या व बाकीच्या जगाच्या विरोधात असणाऱ्या एका विशिष्ट भागाचा नाही. म्हणून हे स्पष्ट होतंय की धर्मशील जीवनाचा संबंध संपूर्णाशी आहे, विशिष्टाशी नाही.

**प्र:** तुम्ही काय म्हणता हे मला समजतंय. आपल्याला संपूर्ण जीवनाला तोंड द्यायचे आहे. अध्यात्म म्हटले जाते त्यापासून आपण जगाला वेगळे पाडू शकत नाही. मग प्रश्न उरतो, जगातील सर्व गोष्टींशी धर्मशीलतेने कसे वागू शकणार?

संपादकीय

## धर्मशील मन

**पा**रंपारिक धर्म आणि धर्मशील मन ह्यांचा काहीही संबंध नाही, उलट, 'धर्म हा धर्मशील मनाच्या मार्गातील मोठा अडसर आहे', हे कृष्णमूर्तींचे म्हणणे आपण जर खोलवर आणि गंभीरपणे विचार केला तर स्पष्ट होईल. सर्वसाधारण समज असा असतो की धर्माप्रमाणे वागणाऱ्याचे मन धर्मशील असते. खरे तर धर्मशील मन मुक्त असते. कुठल्याही धर्माला वाहून घेतलेले मन हे त्या धर्माचे धर्मग्रंथ, कर्मकांड, प्रथा ह्यांनी बांधलेले असते. दुसरे म्हणजे धर्मशील मनात विरोधाची भावना नसते. एका धर्माला स्वीकारलेले मन कळत, नकळत इतर धर्मांच्या विरोधात असते. ह्या विरोधाची अक्राळ, विक्राळ रूपे म्हणजे आजचा आतंकवाद, धर्मयुद्धे.

मग पारंपारिक धर्माशी दुरारार्थाने पण संबंध नसलेले हे धर्मशील मन काय आहे? कृष्णमूर्तींना इथे काय म्हणायचे आहे? शब्दात न सामावणारी गोष्ट – शब्दच जे समजण्याला अडथळा करतात, त्याच शब्दांच्या सहाय्याने शब्दांच्या कुंपणापर्यंत पोहोचता येते परंतु त्या गोष्टीपर्यंत पोहोचता येत नाही. धर्मशील मन समजण्यासाठी शब्दांच्या मर्यादा समजल्या पाहिजेत.

शब्दाला मर्यादा असतात. शब्दांच्या मर्यादा म्हणजेच विचारांच्या मर्यादा कळल्या तर विचाराने निर्माण केलेले अनेक भ्रम उलगडू लागतील आणि मनाला वाटत असलेल्या अनेक सुरक्षा कवचांचा फोलपणा दिसू लागेल. विचाराने निर्माण केलेला सर्वात मोठा भ्रम म्हणजे 'मी' चे प्रबळ अस्तित्व. भ्रम हा भ्रम आहे हे प्रत्यक्षात दिसते तेव्हा भ्रम विरून जातो; मग जे राहते ती अवस्था म्हणजे 'धर्मशील' मन. ही अवस्था ध्येय बनू शकत नाही. तेव्हा तिच्याप्रत नेणारा मार्ग नाही. हे गवसणे व सर्वार्थाने स्तब्ध होणे शक्य आहे का? हा यक्ष प्रश्न आहे.

---

**कृष्णमूर्ती:** धार्मिकतेने वागणे म्हणजे तुम्हाला काय म्हणायचे आहे? तुम्ही असे तर नाही म्हणत की त्या जीवनात विभाजन असत नाही? – धार्मिक व ऐहिक जीवनातील विभाजन, 'काय आहे' व 'काय असावे' ह्यातील विभाजन, तू व ती मधील विभाजन, आवड व नावड ह्यातील विभाजन असत नाही? हे विभाजन म्हणजे संघर्ष. संघर्षयुक्त जीवन म्हणजे धर्मशील जीवन नव्हे. जेव्हा आपण संघर्ष खोलवर समजतो तेव्हा धर्मशील जीवनाची शक्यता असते. ते समजणे ही प्रज्ञा आहे. प्रज्ञाच फक्त योग्य कृती करू शकते. ज्याला लोक बुद्धी म्हणतात ती तांत्रिक ज्ञानाने, धंद्यातील हुशारीने किंवा राजकारणातील लुच्चेगिरीने आलेली बधिरता असते.

**प्र:** म्हणजे माझ्या प्रश्नाचा अर्थ असा आहे की, संघर्षाशिवाय कसे जगावे आणि ती खऱ्या पावित्र्याची भावना कशी जागवावी जी कुठल्याही धर्माच्या बंधनातील भावुकतेतून निर्माण झालेली श्रद्धा नसावी. मग ते बंधन कितीही पुरातन किंवा आदरणीय असेल.

**कृष्णमूर्ती:** एखादा माणूस एखाद्या खेड्यात खूप सगळ्या संघर्षाशिवाय जगत असेल, किंवा एखाद्या पवित्र गुहेत राहून स्वप्न पहात असेल, परंतु आपण ज्या धर्मशील जीवनाविषयी बोलत आहोत तसा तो नक्कीच जगत नाही. संघर्षाचा अंत ही अत्यंत जटील समस्यांपैकी एक समस्या आहे. त्यासाठी स्वत:कडे बघण्याची तसेच बाह्य व आतंरिक विश्व ह्यांचे भान ठेवणारी संवेदनशीलता असणे आवश्यक आहे. आपल्यातील विसंगती समजेल तेव्हाच संघर्ष संपेल. ज्ञातापासून – म्हणजेच भूतकाळापासून मुक्ती नसेल तर विसंगती सतत राहणार. भूतकाळापासून मुक्ती म्हणजे वर्तमानात जगणे, तिला काळ लागू नाही. तिथे ज्ञाताचा व भूतकाळाचा स्पर्श न झालेली मुक्तता कार्यरत असते.

**प्र:** भूतकाळापासून मुक्ती म्हणजे तुम्हाला नेमके काय म्हणायचे आहे?

**कृष्णमूर्ती:** भूतकाळ हा गोळा केलेल्या आठवणींचा साठा असतो. स्मृती वर्तमानात कार्यरत होतात आणि भविष्याबद्दलची आशा व भीती निर्माण करतात. ह्या भीती आणि आशा म्हणजेच आपला मानसिक भविष्यकाळ असतो. ह्या स्मृतींविना भविष्यकाळ असूच शकत नाही. म्हणून वर्तमान हा भूतकाळाची निर्मिती आहे आणि मन ह्या भूतकाळाच्या हालचालींशीच संबद्ध असते. भूतकाळ हा वर्तमानाची घडण करतो व ज्याला आपण भविष्य म्हणतो त्याचीही निर्मिती करतो. भूतकाळाचा प्रतिसाद हा आपल्या स्वाधीन नसतो, तो अहेतुक असतो. न बोलावता, निमंत्रणाविना येतो, आपल्याला जाणीव होण्यापूर्वीच तो हजर होतो.

**प्र:** अशा परिस्थितीत आपण मुक्त कसे होणार?

**कृष्णमूर्ती:** निवडीशिवाय ह्या हालचालीबद्दल जागृत असणे – कारण निवड करण्याची प्रक्रिया ही भूतकाळाचीच कृती आहे – भूतकाळ कृतीशील असताना पाहणे. हे जे पाहणे आहे ती भूतकाळातून उद्‌भवणारी कृती नव्हे. भूतकाळातील प्रतिमेशिवाय पाहणे, ज्यात भूतकाळाला विराम मिळाला आहे अशा स्थितीतील ही कृती. विचाराविना झाड पाहणे ही पण भूतकाळाशिवायची कृती आहे. भूतकाळाची कृती पाहणे ही पण भूतकाळाशिवायची कृती आहे. जे पाहिले जाते त्यापेक्षा बघण्याची अवस्था ही अधिक महत्त्वाची आहे. त्या निवडीशिवाय पाहण्यात भूतकाळाबद्दल सजग असणे, ही फक्त वेगळी कृती नव्हे तर वेगळे 'असणे' आहे. ह्या जागरूक अवस्थेत स्मृती कोणत्याही अडथळ्याशिवाय व कार्यक्षमतेने काम करते. धर्मशील असणे म्हणजे खरोखर इतके निर्हेतुकपणे अवधान असणे की जिथे आवश्यकता असते तिथे ज्ञाताची कृती होत असली तरीही तिथे ज्ञातापासून मुक्ती असते.

**प्र:** परंतु करू नये तिथेसुद्धा कधीकधी ज्ञात, भूतकाळ कृती करतात; ते जणू संघर्ष निर्माण करण्यासाठी कृती करतात.

**कृष्णमूर्ती:** ह्याबद्दल सजग असणे म्हणजे भूतकाळ जो कार्यरत असतो, त्यासंबंधी कृती न करण्याची अवस्था असते. म्हणून ज्ञातापासून मुक्ती म्हणजे खरोखर धर्मशील जीवन आहे. ह्याचा अर्थ असा नव्हे की ज्ञात असलेले सगळे पुसून टाकणे. परंतु एका निराळ्या परिमाणामधून त्या ज्ञाताला पाहणे. निवडीविना पाहण्याची कृती म्हणजे प्रेमाची कृती. ही कृती हे धर्मशील जीवन आहे आणि संपूर्ण जीवन म्हणजे अशीच कृती करत जगणे असते. धर्मशील मन म्हणजे हीच कृती असते. म्हणून धर्म, मन, जीवन, प्रेम हे सर्व एकच आहे.

*The Urgency of Change*

# धर्मशील मन म्हणजे काय?

फक्त धर्मशील मन आपल्या समस्यांचे निराकरण करू शकते, वैज्ञानिक मन हे अजिबात करू शकत नाही. धर्मशील मन म्हणजे काय हे – केवळ सैद्धांतिक दृष्टीने नव्हे, तर प्रत्यक्ष समजून घेण्यासाठी आपण चिन्हाचे फक्त संशोधन करायचे नसते, केवळ त्या प्रत्येक चिन्हाबद्दल प्रश्न उपस्थित करायचा नसतो, तर त्याच्या प्रभावाचीही चिकित्सा करणे आवश्यक असते. आपल्याला एखादी गोष्ट किती सहजपणे पटवली जाते, किती सहजपणे आपण एखाद्या कल्पनेच्या – खरे सांगायचे तर प्रचाराच्या आहारी जातो! किती सहजपणे आपल्या भावना एखाद्या नव्या गोष्टीमध्ये किंवा नवीन वाटणाऱ्या पळवाटेमध्ये गुंततात. आपण फक्त चिन्हांचेच गुलाम बनत नाही तर समाजातील सर्व प्रकारचे प्रभाव, परंपरा, कुटुंबाचे संस्कार, नाव, व्यवसाय, छापील शब्द, वृत्तपत्रे, पुस्तके, ग्रंथ ह्यांचा प्रभाव, हुशार समजल्या जाणाऱ्या प्रसिद्ध विद्वानांचा, नेते समजल्या जाणाऱ्या व्यक्तींचा प्रभाव अशा अनेक प्रभावांमुळे आपण गुलाम बनतो. किती सहजपणे आणि किती हानिकारकपणे आपण उलटसुलट पद्धतीने विचार करण्यास, एका विशिष्ट प्रकारे कृती करण्यास प्रभावित केले जातो आणि एखादी सवय किंवा पद्धत अनुसरण्यास प्रवृत्त केले जातो. प्रत्येक प्रभावाचा शोध घेणे, त्याविषयी जागृत होणे, अवधान देणे आणि तरीसुद्धा त्यामध्ये न अडकता तुम्ही एखादे पुस्तक वाचत असताना त्याच्या प्रभावाविषयी अवधान असणे, जागृत असणे, कुटुंबातील ताण-तणावाबद्दल जागृत असणे, ज्याचा संस्कृतीमध्ये – संस्कारामध्ये तुम्ही वाढला आहात त्याबद्दल अवधान असणे – ह्यालाच प्रज्ञाजागृती म्हणतात.

हे जर आपल्या प्रत्येकाला स्पष्ट झाले असेल तर आपण धर्मशील मन म्हणजे काय ह्याचा शोध घेण्याची सुरुवात करू शकतो आणि मग वैज्ञानिक, आधुनिक, विसाव्या शतकाच्या मनाचा आपण वेध घेऊ शकतो. खरे वैज्ञानिक मन आणि खरे धर्मशील मन ही दोनच मने विसाव्या शतकात असू शकतात, अंधश्रद्धा असलेली, श्रद्धाळू, मंदिरात जाणारी, चर्चमध्ये पूजा करणारी मने नव्हेत. वैज्ञानिक मन हे असे मन असते की ते वस्तुस्थितीलाच प्रमाण मानते आणि ऐहिक वस्तुस्थितीचे विश्लेषण करणे – म्हणजे मायक्रोस्कोपखाली संशोधन करणे – ह्याला प्रचंड ज्ञानसंचयाची गरज असते आणि असे वैज्ञानिक मन हे विसाव्या शतकाची निर्मिती आहे. वैज्ञानिक मन, तथाकथित सुशिक्षित मन, ज्या मनाने एखादे तांत्रिकी ज्ञान आत्मसात केलेले आहे आणि जे आधुनिक ज्ञानासह तर्कशुद्ध विचार करते, ते नेहमीच ज्ञातापासून ज्ञाताकडे जात असते, एका वस्तुस्थितीकडून दुसऱ्या वस्तुस्थितीकडे. असे मन अत्यंत आवश्यक असते कारण ते तर्कशुद्धतेने, सूज्ञपणे, बुद्धिप्रामाण्याने अचूकपणे त्याचा विचार करते. परंतु असे मन स्वत:ला साहजिकच मुक्त करू शकत नाही, जे संग्रहित ज्ञानाच्या पलिकडे आहे त्याचा शोध घेण्यासाठी ते मुक्त असले पाहिजे – जे धर्माचे कार्य आहे.

तेव्हा आपण धर्मशील मन म्हणजे काय हे नकारात्मक दृष्टीने शोधून काढणार आहोत. प्रथमत: धर्मशील मन हे साहजिकच श्रद्धाळू मन नसते, कारण श्रद्धा सुरक्षित असण्याच्या इच्छेवर आधारित असते, संरक्षित असणे आणि म्हणून कुठच्याही प्रकारची श्रद्धा ही योग्य शोध घेण्यास, प्रश्न करण्यास प्रतिबंध करते. जर मी राष्ट्रवादावर विश्वास ठेवला तर मग मी संभवत: विश्वबंधुत्वाचा खऱ्या अर्थाने शोध घेऊ शकणार नाही. मी राष्ट्रवाद नाकारला पाहिजे तरच मी दुसऱ्याबरोबर शांततेने कसे जगावे ह्याचा बंधुत्वाच्या भावनेने विचार करू शकतो, परंतु आपले बहुतेक धर्म ह्या श्रद्धा आहेत. तुम्ही विश्वास ठेवता की, तिथे ईश्वर आहे. कारण तुम्हाला गेल्या दहा हजार वर्षांपासून प्रचाराच्या माध्यमातून सांगण्यात आलेले आहे की तेथे ईश्वर आहे, की तेथे आत्मन आहे – सर्व प्रकारची शाब्दिक विधाने, शब्द आणि सिद्धांताचा कीस पाडून हे तुमच्या मनावर बिंबवले गेले आहे. तुम्ही त्यावर विश्वास ठेवता कारण तुम्हाला अशा प्रकारेच वाढवले गेले आहे, पढवले गेले आहे. जेव्हा ह्या जगाच्या दुसऱ्या टोकाला तुम्ही जाता – रशिया आणि त्या बाजूला – तुम्हाला आढळून येते की ते कोणत्याही ईश्वरीय किंवा तत्सम संकल्पनेवर विश्वास ठेवत नाहीत. कारण त्यांना विश्वास न ठेवण्याच्या पद्धतीने वाढवलेले असते. ईश्वरावर विश्वास ठेवणारा आणि ईश्वरावर विश्वास न ठेवणारा ह्या दोघांमध्ये फारसा फरक नसतो. कारण ते दोघेही शब्दांचे, प्रचाराचे गुलाम असतात. एखादा हजार वर्षांच्या प्रचाराचा तर दुसरा चाळीस वर्षांच्या प्रचाराचा बळी असतो. मला माहीत आहे की तुम्ही हसणार, मला माहीत आहे की तुम्हाला हे विनोदी वाटेल पण तरीसुद्धा तुम्ही विश्वास ठेवणार आहात, जो मनुष्य ईश्वर आहे किंवा नाही ह्याचा शोध घेऊ इच्छितो त्याने अर्थातच त्याची संस्कारबद्धता, ईश्वरावरची श्रद्धा पूर्णपणे नाकारली पाहिजे.

मद्रास १९६१, भाषण ८

# धर्मशील मनामध्ये वैज्ञानिक मन अंतर्भूत असते

धर्मशील मन हे सर्व अधिकारापासून मुक्त असते आणि अधिकारापासून मुक्त राहणे फार कठीण असते – केवळ आपल्यावर लादलेला अधिकारच नव्हे तर अनुभवाने प्राप्त झालेला अधिकार असतो, जो भूतकाळ असतो, जी परंपरा असते आणि धर्मशील मनाला श्रद्धा नसतात. त्याला ठराविक ठाम मते नसतात. ते धर्मशील मन वस्तुस्थितीपासून वस्तुस्थितीकडे असे पुढे सरकत असते आणि म्हणून धर्मशील मन हे वैज्ञानिक मन असते. परंतु वैज्ञानिक मन हे धर्मशील मन नसते. धर्मशील मनामध्ये वैज्ञानिक मन सामावलेले असते. जे मन विज्ञानाच्या माहितीने प्रशिक्षित झालेले असते ते धर्मशील मन नसते.

धर्मशील मन हे समग्रतेशी जोडलेले असते. एका विशिष्ट कामासाठी नव्हे, तर मानवी अस्तित्वाच्या एकूण कार्याशी संबंधित असते. मेंदू एका विशिष्ट कामाशी निगडित असतो. त्यामध्ये तज्ज्ञ सामावलेला असतो. एक वैज्ञानिक म्हणून एका निवडक, खास विषयामध्ये तो काम करीत असतो. हे विशिष्ट ज्ञानामध्ये प्रवीण असलेले लोक त्यांनी संकुचित केलेल्या तंत्रज्ञानामुळे विभाजन निर्माण करतात. फक्त अंतरंगातीलच विभाजन नव्हे तर बाहेरीलसुद्धा. वैज्ञानिक हा बहुतांशी सध्या समाजाला आवश्यक असणारी खूप महत्त्वाची व्यक्ती बनला आहे, जसा डॉक्टर असतो. तेव्हा त्याचे काम खूप महत्त्वाचे बनते आणि त्याच्याबरोबर येते सामाजिक स्थान, प्रतिष्ठा; म्हणून जिथे विशेष ज्ञान प्राप्त केलेले असते तिथे आंतर्विरोध असलाच पाहिजे आणि मग संकुचित होत जाणे, आणि तेच मेंदूचे कार्य बनते.

*The Book of Life : Daily Meditations with Krishnamurti,* Sept. 30

# धर्मशील मन व विज्ञाननिष्ठ मन

आज प्रात:काळी मी एक सुंदर पक्षी पाहिला. तो काळा होता. त्याची मान लाल होती. त्या पक्ष्याचे नाव काही मला ठाऊक नाही. तो पक्षी या झाडावरून त्या झाडावर उडत होता. त्याच्या हृदयात आनंदाचे गाणे भरलेले होते. त्या पक्ष्याचे दर्शन किती विलोभनीय होते! आज सकाळी मला तुमच्याशी जरा गंभीर विषयावर बोलावेसे वाटते. ते तुम्ही लक्षपूर्वक ऐकायला हवे. नंतर वाटले तर तुम्ही तुमच्या शिक्षकांशी त्याबाबत चर्चा करू शकाल. मला ज्या विषयाबद्दल बोलावेसे वाटते, त्याच्याशी सर्व जगाचा संबंध आहे. त्याबद्दल सर्व जग सचिंत आहे. तो प्रश्न आहे धर्मभावनेचा व विज्ञाननिष्ठ मनाचा. जगात या दोन वृत्ती आहेत. खरी धर्मभावना व खरे विज्ञाननिष्ठ मन, मनाच्या या दोन अवस्थाच काय त्या महत्त्वाच्या आहेत. अन्य प्रत्येक कृती विनाशकारी आहे आणि त्यातून फार मोठी विपत्ती, गोंधळ व दु:ख हेच निर्माण होते.

विज्ञाननिष्ठ मन हे केवळ वस्तुस्थितीला धरून राहते. शोध घेणे हेच त्याचे उद्दिष्ट व तोच त्याचा बोध. ते सूक्ष्मदर्शकातून पदार्थ पाहते, दुर्बिणीतून पाहते, प्रत्येक वस्तू जशी प्रत्यक्ष आहे तशी त्यास पाहावयाची असते. त्या प्रत्यक्ष दर्शनावर आधारूनच विज्ञान निष्कर्ष काढते...

...दुसरे मन म्हणजे धर्मशील मन. ते स्फोटक असते, नवे, तरुण, ताजे, निष्पाप असते. असे निष्पाप, निरागण, तरुण, असामान्य लवचिक, मृदू, तरल, सूक्ष्म मन कुठेही जखडलेले नसते. ज्याला तुम्ही ईश्वर म्हणता, जे केवळ अमेय आहे, त्याची अनुभूती केवळ अशाच मनाला येऊ शकते.

जेव्हा खरीखुरी विज्ञाननिष्ठा व धर्मशीलता यांचा संगम होतो, तेव्हाच मनुष्य खऱ्या अर्थाने 'मनुष्य' बनतो. असे झाले तर मानव फार महान जग निर्माण करतील. ते जग साम्यवादी किंवा भांडवलवादी जग नसेल. ब्राह्मणांचे किंवा रोमन कॅथलिकांचे नसेल. वस्तुत: ज्या मनुष्याला कोणतेही धार्मिक ब्रीद नसते, संप्रदाय नसतो, वर्ग नसतो, सत्ता नसते, समाजात कोणताही अधिकार नसतो, तोच खरा 'ब्राह्मण' होय. ज्याच्या मनात विज्ञाननिष्ठेची व धर्मशीलतेची उत्तम सांगड घातलेली असते आणि म्हणून ते एकजिनसी, एकसंध असते, ज्याच्या मनात विसंगती नसते, तोच खरा ब्राह्मण होय, नवीन मानव होय आणि मला वाटते की असे समाजाच्या जखडबंद पठडीत न सापडणारे नवे स्फोटक मन निर्माण करणे हाच शिक्षणाचा उद्देश आहे.

धर्मशील मन हे सर्जनशील मन असते. त्याने केवळ भूतकाळच उडवून लावायचा नसून वर्तमानातही स्फोटक राहायचे असते आणि गीता, उपनिषदे किंवा बायबल यावर अर्थ स्पष्ट करणारी भाष्ये लिहिणाऱ्या मनात शोध घेण्याचे सामर्थ्य नसून, ते सामर्थ्य अशाच स्फोटक मनात असते आणि त्यात ज्वलंत सत्याचा आविष्कार करण्याचेही सामर्थ्य असते. असल्या भाष्यांचा किंवा आग्रही मतांचा इथे काही संबंध नसतो.

धर्मशील असून स्पष्ट, बिनचूक, विज्ञाननिष्ठ मन असणे, निर्भय मन असणे, स्वत:च्या सुरक्षिततेची काळजी न करणारे, स्वत:ला वाटणाऱ्या भयांचाच केवळ विचार करीत न बसणारे मन असणे, ही गोष्ट विलक्षण अवघड आहे. स्वत:बद्दल पूर्ण ज्ञान असल्याशिवाय, स्वत:बद्दल पूर्ण बोध असल्याशिवाय, तुमचे शरीर, तुमच्या भावना, तुमचे मन कसे कार्य करते, विचार कसा कार्यशील होतो, या गोष्टींची पूर्ण समजूत असल्याशिवाय तुमचे मन धर्मशील होऊ शकत नाही आणि या सर्वाला अनावृता करून त्याच्या पलीकडे जाण्यासाठी, त्याकडे तुम्ही विज्ञाननिष्ठ मनाने पाहिले पाहिजे. तंतोतंत, बिनचूक स्पष्ट पाहणाऱ्या, तसेच पूर्वग्रहांनी दूषित न झालेल्या, कशाचाही धिक्कार न करणाऱ्या, निरीक्षण करणाऱ्या, अवलोकन करणाऱ्या मनाने त्याचा मागोवा घेतला पाहिजे. तुमचे मन जेव्हा असे असते, तेव्हाच तुम्हांला सुसंस्कृत मनुष्य म्हणता येईल. जिव्हाळा, अनुकंपा म्हणजे काय, ते समजणाऱ्यास मनुष्य म्हणता येईल. अशा माणसालाच जिवंत असणे म्हणजे काय, हे खरे समजते.

*शिक्षण-संवाद*, विद्यार्थ्यांशी संवाद, प्र. २

# आदरांजली

कृष्णमूर्ती फाउंडेशनचे विश्वस्त आणि बेंगलुरू एज्युकेशन सेंटरचे संचालक डॉ. सतीश इनामदार यांचे १ जानेवारी २०१६ रोजी त्यांच्या राहत्या घरी मिरज येथे दु:खद निधन झाले. ते ७० वर्षांचे होते.

कॅन्सर सर्जन असलेले डॉ. इनामदार १९६० च्या दशकात कृष्णमूर्तींच्या संपर्कात आले. परंतु जेव्हा १९८८ साली त्यांनी राजघाट बेझंट स्कूल वाराणसी येथे शिक्षक म्हणून सुरुवात केली तेव्हा त्यांचा कृष्णमूर्तींच्या कार्याशी प्रत्यक्ष सहभाग सुरू झाला. त्यानंतर १९९२ साली त्यांनी बेंगलुरू जवळील व्हॅली स्कूलची जबाबदारी स्वीकारली आणि त्या शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी स्वत:ला वाहून घेतले. त्या निसर्गसुंदर परिसरातच त्यांनी कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र सुरू केले. त्या ठिकाणी आज नियमित कार्यशाळा, शिक्षकांना कृष्णमूर्तींचा शिक्षण विषयक दृष्टिकोन समजावून देण्यासाठी प्रशिक्षण तसेच इतर उपक्रम राबविले जातात. ह्या अध्ययन केंद्रामार्फत कृष्णमूर्तींची अनेक इंग्रजी पुस्तके कन्नड भाषेमध्ये अनुवादित केली जातात. तसेच कन्नड भाषेमधून एक नियतकालिक प्रकाशित केले जाते.




डॉ. इनामदारांचा कृष्णजींच्या आध्यात्मिक विचाराने मानवी मनाचा व वैश्विक चैतन्याचा वेध घेण्याचा ध्यास शेवटपर्यंत अथक चालू होता. त्यांचे व्यक्तिमत्त्व अगदी अभ्यासू, कलासक्त, निगर्वी आणि मनमिळावू होते आणि म्हणून त्यांच्या आकस्मिक निधनाने आपल्या जवळचा मित्र हरपल्याची हळहळ त्यांच्या सर्व मित्र परिवाराला लागून राहिली.

अंतरलहरीची डॉ. इनामदार यांना भावपूर्ण आदरांजली!

# पुस्तक परीक्षण

## School Without Fear




अलिकडेच KFI ने प्रकाशित केलेल्या *School Without Fear* या इंग्रजी पुस्तकामध्ये कृष्णमूर्तींनी राजघाट बेझंट स्कूल, वाराणसी ह्या शाळेमध्ये डिसेंबर १९५४ ते फेब्रुवारी १९५५ ह्या काळात शिक्षक व पालक ह्यांच्याबरोबर शिक्षण या विषयावर केलेले संवाद आहेत. ह्या संवादांमधून कृष्णमूर्तींनी त्यांना अभिप्रेत असलेले सर्वांगीण शिक्षण म्हणजे काय हे स्पष्ट केलेले असून वसतिगृह असलेल्या शाळा चालविताना येणारे प्रत्यक्ष अनुभव व अडचणी ह्यांची सखोल चर्चा केली आहे. आजच्या शिक्षणाच्या असंख्य समस्यांना त्यांनी ह्या २६ संवादांमधून उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला आहे. प्रथमच प्रकाशित होत असलेले हे संवाद कृष्णमूर्तींनी एकाच ठिकाणी शिक्षण या विषयावर केलेले प्रदीर्घ चिंतन आहे.

ह्या २२२ पानी पुस्तकाची किंमत रु. २५०/-असून ते मुंबई केंद्रावर उपलब्ध आहे.

## ज्ञातापासून मुक्ती

'ज्ञातापासून मुक्ती' हे मराठी पुस्तक आता मोठ्या टाइपमध्ये उपलब्ध झाले असून त्यामुळे ज्येष्ठ नागरिक आणि कमजोर दृष्टी असलेल्यांची सोय झाली आहे. *Freedom From the Known* ह्या इंग्रजी पुस्तकाचा हा मराठी अनुवाद असून कृष्णमूर्तींच्या आध्यात्मिक दृष्टीकोनाचे सार यामध्ये सामावलेले आहे. हे पुस्तक मुंबई केंद्रावर उपलब्ध आहे. पुस्तकाची किंमत रु.३२५/-.

## वार्षिक संमेलन

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे वार्षिक संमेलन ह्या वर्षी नोव्हेंबर २०१६ मध्ये आंध्र प्रदेशातील ऋषी व्हॅली ह्या शाळेमध्ये, जेव्हा शाळेला सुट्टी असते तेव्हा होणार आहे. संमेलनाच्या तारखा, फी व इतर माहिती या www.kfionline.org ह्या संकेतस्थळावर योग्य वेळी जाहीर केली जाईल. तसेच ही माहिती KFI च्या जुलै २०१६ च्या अंकात प्रकाशित होईल.

**कृष्णमूर्तींविषयीच्या काही वेबसाईटस्:**

| | |
|---|---|
| www.jkrishnamurti.org | www.kfionline.org |
| www.rishivalley.org | www.j-krishnamurti.org |
| www.kfistudy.org | www.kscskfi.com |
| www.jkrishnamurtionline.org | www.kfa.org |
| www.kfoundation.org | www.kinfonet.org |

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,** वसंतविहार, १२४, १२६, ग्रीनवेज रोड, चेन्नई - ६00 0२८. • दूरध्वनी: ०४४०-२४९३७८०३/२४९३७५९६ • ईमेल: info@kfionline.org • वेबसाईट: www.kfionline.org • कृष्णमूर्तींच्या भाषणांच्या आणि संवादांच्या अनेक डिव्हिडीज् आता आपण ऑर्डर पाठवून मागवू शकता. ही यादी वेबसाईटवर उपलब्ध आहे. • दर महिन्याच्या तिसऱ्या शुक्रवारपासून रविवार संध्याकाळपर्यंत निवासी अध्ययन शिबीरे आयोजित केली जातात.

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बेंगलुरू:** संपर्क: द स्टडी, व्हॅली स्कूल कँपस, १७ कि.मी. कनकपुरा रोड, थातगुणी पोस्ट, बेंगलुरू-५६००६२.
दूरध्वनी: ०८० - २८४३५२४३ • ईमेल: kfistudy@gmail.com • वेबसाईट: www.kfistudy.org

| | |
|---|---|
| ०९-१७ मे २०१६ | Understanding hurt, frustration, and anger. |
| ०७-१० जुलै २०१६ | Can I be a responsible parent without understanding myself? |
| ११-१४ ऑगस्ट २०१६ | What does it mean to 'Live in the here and now'? |
| ०८-११ सप्टेंबर २०१६ | Education and the understanding of Life |
| ०६-०९ ऑक्टोबर २०१६ | Harmony in relationship |
| १०-१३ नोव्हेंबर २०१६ | Breaking free from the prison of the mind |
| ०७-११ डिसेंबर २०१६ | What are you doing with your Life? |

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, राजघाट- वाराणसी:** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, राजघाट फोर्ट, वाराणसी २२१ ००१.
दूरध्वनी: ०५४२ - २४४१२८९ / २४४०३२६ • ईमेल: kcentrevns@gmail.com • वेबसाईट: www.j-krishnamurti.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, सह्याद्री:** पोस्ट - तिवई हिल, तालुका खेड (राजगुरुनगर), जिल्हा - पुणे, पिन - ४१०५१३, महाराष्ट्र
दूरध्वनी : (०२१३५) २८८७७२, २८८३४८, २०३४७५ • ईमेल : kfisahyadri.study@gmail.com • वेबसाईट : http://www.kscskfi.com

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, ऋषी व्हॅली:** जिल्हा चित्तूर, आंध्र प्रदेश - ५१७३५२
दूरध्वनी : (०८५७१) २६०३७/६८६२२/६८५८२ • ईमेल: study@rishivalley.org • वेबसाईट : http://www.rishivalley.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, उत्तरकाशी:** पोस्ट रानारी, डुंडा ब्लॉक, जिल्हा उत्तरकाशी - २४९१५१. • ईमेल: krc.himalay@gmail.com
दूरध्वनी : ९४१२४ ३६४२९/९४१५९८३६९० • वेबसाईट : http://www.jkrishnamurtionline.org भारतीय भाषांमधील संकेतस्थळ

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, कोलकाता:** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, ३०, देवदार स्ट्रीट, कोलकाता - ७०००१९.
दूरध्वनी : (०३३) ४००८२३९८ • ईमेल: kfikolkata@gmail.com

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, कटक:** ओरिसा, पुरीघाट रोड, तेलेंगा बझार, कटक - ७५३००९, ओरिसा.
दूरध्वनी : (०६७१) ६४१७९९० • ईमेल: kficuttackcentre@gmail.com • वेबसाईट : www.kficc.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बदलापूर:** आनंद-विहार, जे. कृष्णमूर्ती सेल्फ एज्युकेशन सोसायटी, जांभिळघर, राहाटोली गावाजवळ, बदलापूर (प.), ता. ठाणे, पिनकोड- ४२१५०३. दूरध्वनी: (०२२) २५०१४०९४, २४२२३१९९ • ई मेल: jksesbadlapur@gmail.com • वेबसाईट : www.jkses.org

# धर्मशील मनाचा स्थायीभाव

**मा**नवाच्या अंतरंगातील हिंस्रपणाचे पर्यवसान घडवून जगात किती भयंकर अत्याचार होत आहेत त्यांच्या बातम्या आपण रोज वर्तमानपत्रात वाचतो किंवा प्रत्यक्षही पाहतो. 'त्याला मी काय करणार? अखिल जगतावर माझा प्रभाव तो काय पडणार?' असे यावर तुम्ही म्हणाल, पण मला खात्री आहे की, जर तुम्ही तुमच्या अंत:करणात हिंसेला अजिबात थारा दिलाच नाही, प्रत्यक्ष रोज जर शांततेने जगलात-स्पर्धा, महत्त्वाकांक्षा, हेवेदावे, मत्सर यांना पूर्णपणे फाटा देऊन निर्वैर, अजातशत्रू हृदयाने जगलात तर तुम्ही जगावर खूप प्रभाव पाडू शकाल. लहानशी शांतीची ज्योतच सर्वत्र प्रकाश पाडील. आपणच आपल्या स्वार्थकेंद्रित कर्मांनी जगाची ही सांप्रतची स्थिती ओढवून घेतलेली आहे. आपले दूषित पूर्वग्रह, आपले द्वेषभाव, आपले राष्ट्रवाद यांनीच जगात गोंधळ माजला आहे. 'त्याला मी काय करणार?' असे आपण म्हणतो तेव्हा आपल्याच आंतरिक गैरव्यवस्थेची व गोंधळाची आपण स्वीकृती करतो. खरोखर, आपण आपल्या तुटकपणाने या जगाच्या चिरफळ्या केल्या आहेत. आपण दुजाभावाने वागतो, आपल्यातच भेदभाव, द्विधा वृत्ती आहे म्हणून माणसामाणसांमधले सर्व संबंध भंगलेले, तुटकपणाचे झाले आहेत. पण जेव्हा आपण कोणतीही कृती करतो तेव्हा जर ती अगदी सर्वस्व पणाला लावून, काया-वाचा-मनाने एकरूपता असताना केली तर आपल्या जगाजवळच्या साऱ्या संबंधात आमूलाग्र स्थित्यंतर होऊन एक क्रांतीच घडते.

एकंदरीत पाहता कोणतीही उपयुक्त चळवळ असो, नाव घेण्यासारखे, खोल तथ्यांश असलेले कोणतेही कार्य असो, त्याचा प्रारंभ आपल्या प्रत्येकाकडूनच झाला पाहिजे. बदलायचे तर मी माझ्यातच प्रथम बदलले पाहिजे. माझ्याच जगाशी असलेल्या संबंधाची रचना, स्वरूप मीच तपासून पाहायला हवे आणि त्या पाहण्यातच मुळी कृती घडत असते. त्यामुळे मी एक मानव, या जगाचा एक घटक, या जगात जगताना एक वेगळीच गुणवत्ता उदयास आणतो आणि मला असे वाटते की, ती गुणवत्ता म्हणजेच धर्मशील मनाचा अंगभूत गुण होय.

पण धर्मावर श्रद्धा ठेवणाऱ्या मनापेक्षा खरे धर्मशील, खरे धार्मिक मन हे फारच वेगळे असते. खऱ्या अर्थाने तुम्ही धर्मशील असलात तर त्याच वेळी स्वत:ला हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती किंवा बौद्ध म्हणून घेता येणार नाही. धार्मिक मनाला कशाचाच हव्यास नसतो. ते निरपेक्ष असते. सत्याचे प्रयोग व अनुभवही त्याला नको असतात. तुमच्या सुख-दु:खांवर काही सत्य अवलंबून नसते किंवा हिंदुत्वाचा किंवा तुमचा जो काही 'धर्म' असेल त्याच्या संस्कारांवर अवलंबून नसते. धर्मशील मन म्हणजे अशी अवस्था की, जिथे पूर्ण निर्भयता असते. म्हणूनच तिथे कशावर तरी श्रद्धा-विश्वास ठेवण्याची बातच नसते. जे प्रत्यक्ष आहे, जे वर्तमान आहे, तेच तिथे वास्तवतेने असते.

या धर्मशील मनाचा स्थायीभाव शांतीची अवस्था असते. ती शांती विचारांनी तयार केलेली नसते, ती सावधानतेतून उदयास आलेली असते. त्या विलक्षण प्रशांत अवस्थेविषयी आपण आता शोध घेतला आहे. ती शांती म्हणजेच 'ध्याता' म्हणून काहीच न उरलेली चिंतनाची खरी अवस्था. त्या शांतीत सामर्थ्याची अशी अवस्था असते की जिथे कोणताही संघर्ष उठत नाही आणि शक्ती म्हणजेच कृती व चैतन्य होय. सर्वत्र पाहा; कोणतीही कृती ही एक चेतनता असते व कोणतीही कृती शक्तीरूपच असते. ती शक्ती इच्छारूपानेही असते, तीच शक्ती संवित् म्हणून, भावना म्हणूनही असते, तीच शक्ती विचाररूपाने, बुद्धिरूपाने असते. सर्व जीवन म्हणजे ती शक्तीच, सर्व प्राणिमात्रांचे जगणे म्हणजे ती शक्तीच होय. त्या शक्तीला जर कोणताही अडथळा न आणता मुक्त वाव दिला, वाहू दिले तर ती शक्ती अमर्याद, अनंत असते. जेव्हा संघर्ष नसतो तेव्हा तिला कोठेही अटकाव होत नाही, ती असीम असते. शक्तीला मर्यादित करण्याचे कार्य संघर्षामुळेच होत असते. हे सगळे अनुभवास येऊनही, प्रत्यक्ष कळत असूनही माणसे अशी या अनंत शक्तीमध्ये बखेडे का बरे माजवितात? तिला संकुचित का करतात? आपण ज्याला प्राण म्हणतो, जीवन म्हणतो त्यात माणसे असे संघर्ष कशाला आणतात? शुद्ध शक्ती, अमर्याद अनंत शक्ती म्हणजे माणसाच्या दृष्टीने केवळ एक संकल्पनाच असते की काय? तिला वास्तवता नाही का?

*ज्ञातापासून मुक्ती*

---

# खरे क्रांतिकारी मन

**ध**र्मशील मन हे खरे क्रांतिकारी असते. ती क्रांती अशी नसते की जी घडून गेलेल्या गोष्टीवरची प्रतिक्रिया असते, जसे साम्यवाद हा भांडवलशाही विरुद्ध असलेली प्रतिक्रिया आहे. तेव्हा अशी क्रांती ही मुळी क्रांती नसतेच. कोणतीही प्रतिक्रिया ही क्रांती नसते आणि म्हणून प्रतिक्रिया मूलभूत परिवर्तन आणू शकत नाही.

फक्त धर्मशील मनच, जे मन स्वत:चा शोध घेत असते, ज्याला स्वत:च्या क्रिया-प्रतिक्रियांचे, स्वत:च्या कृतीचे भान असते - आणि हीच स्व-ज्ञानाची सुरुवात असते - फक्त असेच मन क्रांतिकारी मन असते आणि क्रांतिकारी मन मूलभूत बदल घडवून आणणारे मन असते, जे धर्मशील मन असते.

आजच्या काळाचे आव्हान आणि प्रत्येक गोष्टीचे आव्हान असे आहे की, तुम्ही जर खरोखर जागृत असाल तर एखाद्या नवीन गोष्टीला तुम्ही संपूर्णपणे कसे सामोरे जाल, कसा प्रतिसाद द्याल. प्रतिसाद देणे म्हणजे मला असं म्हणायचं आहे की आपले सर्व मन एकवटून मेंदूच्या पूर्ण क्षमतेसह, पूर्ण हृदयापासून, अंतरंगामधून तुमच्या संपूर्ण शारीरिक क्षमतेसह, संपूर्णपणे, तुमच्या एकूण अस्तित्वाच्या क्षमतेनुसार सामोरे जाणे, प्रतिसाद देणे असते, फक्त बौद्धिकदृष्ट्या किंवा भावनिक होऊन किंवा भावविवशतेने सामोरे जाणे नव्हे. मला शंका आहे की तुम्ही कधी अशा रितीने कुठच्याही गोष्टीला सामोरे गेले असाल. असे पाहा, जेव्हा तुम्ही अशा प्रकारे संपूर्णपणे एखाद्या गोष्टीला प्रतिसाद देता तेव्हा स्व-केंद्रित कृतीचा तिथे अभाव असतो. जेव्हा तुम्ही एखाद्या गोष्टीला पूर्णपणे प्रतिसाद देता, त्या क्षणी तुम्हाला जाणवेल, त्याच सेकंदाला, की तुमचा 'स्व' त्याच्या सर्व हालचालीसह, त्याचे भय, त्याच्या महत्त्वाकांक्षा, त्याचे क्रौर्य, त्याचे शत्रुत्व सर्व काही नाहीसे झालेले असते आणि म्हणूनच तुम्ही पूर्णपणे प्रतिसाद देऊ शकता. आणि जेव्हा तुमच्यामध्ये संवेदनशीलता असते - जे खरे म्हणजे जीवन जगणे असते - तेव्हाच तुम्ही अशा प्रकारचा प्रतिसाद देता.

मद्रास १९६१, भाषण ८

# त्या निरीक्षणामधून एक विलक्षण शिस्त निर्माण होते

जे मन धर्मशील मनाच्या स्वरूपाचा आणि गुणधर्माचा शोध घेऊ पाहते ते मन धर्मसंस्थांनी घालून दिलेली कडक, कठोर शिस्त, धार्मिकतेची, परंपरेची शिस्त ह्या बंधनांपासून मुक्त असते. परंतु त्या मनाची स्वत:ची असामान्य अशी न दडपलेली आणि अबाधित शिस्त असते जी, जेव्हा तुम्ही वस्तुस्थितीकडे पाहता तेव्हा व्यक्त होते. तुम्हाला माहीत आहे का की वस्तुस्थितीकडे पाहण्यासाठी फार मोठी ऊर्जा लागते. ज्यावेळी तुमच्या मनामध्ये विशिष्ट वस्तुस्थितीबद्दल संदेह, संघर्ष नसतो तेव्हाच तुम्ही त्या वस्तुस्थितीचे अवलोकन करू शकता. इथे वस्तुस्थिती म्हणजे काय हे समजून घेणे आवश्यक आहे. एका विशिष्ट क्षणी तुम्ही जे काही असाल ते, वस्तुस्थिती म्हणजे तुम्ही मत्सरी, महत्त्वाकांक्षी, लोभी, द्वेषी, कठोर, निर्दयी असाल ते. त्या वस्तुस्थितीला सामोरे जाण्यासाठी, पाहण्यासाठी ऊर्जा लागते. जर त्या वस्तुस्थितीबद्दल तुमच्या मनात द्वंद्व असेल, संघर्ष असेल, तर तुम्ही तिच्याबरोबर जगू शकत नाही आणि जेव्हा तुम्ही त्या वस्तुस्थितीकडे संघर्षाशिवाय पाहता तेव्हा ती पाहण्याची कृतीच ऊर्जा निर्माण करते, जी स्वत:ची अशी शिस्त घेऊन येते आणि अशी शिस्त मनाला विपर्यस्त करत नाही. कारण त्यामध्ये काही दडपण असत नाही. आपण निर्माण केलेली सर्व प्रकारची बंधने ही जी वस्तुस्थिती आहे ती दडपण्याची साधने बनली आहेत. कारण आपण पूजा-अर्चा करून कल्पनेयोगे पळवाटा शोधतो. जर तुम्ही ऐकत असाल,- आणि मला आशा आहे आपण ऐकत आहात, केवळ शब्दच नव्हे कारण ते फार सहज आणि भरपूर प्रमाणात उपलब्ध आहेत - जर तुम्ही तुमचे निरीक्षण करीत असाल - जे इथे बोलले जात आहे त्याचे, तर तुम्ही निश्चितच वस्तुस्थितीकडे पाहू शकाल.

जर तुम्ही जे प्रत्यक्ष आहे त्याबरोबर संघर्षामध्ये नसाल, जे तुम्ही स्वत: आहात, तुमचा आत्मन वगैरे काही नव्हे, ज्याला काहीच अर्थ नसतो, तर तुम्हाला आढळून येईल, जसजसे तुम्ही वस्तुस्थितीचे निरीक्षण करीत जाता. त्या निरीक्षणामधून एक विलक्षण शिस्त निर्माण होते.

एखादी गोष्ट अगदी स्पष्टपणे पाहायची असेल तर तुम्ही तिचा धिक्कार करीत नाही, पूर्वदूषित नजरेने तिच्याकडे पाहत नाही - तर वैज्ञानिक मन भावनाविवशतेविना ज्या प्रकारे निरीक्षण करीत असते तसेच अवलोकन.

मद्रास १९६१, भाषण ८

# सर्व पद्धती सोडून द्या

धार्मिक मन किंवा नवीन मन कसे अस्तित्वात येईल? तुम्ही एखादी पद्धत, प्रणाली का अनुसरता? एका प्रणालीमधून - प्रणाली म्हणजे एक पद्धत, सराव, पुन: पुन्हा, दिवसेंदिवस करता येणारी गोष्ट - नवीन मन निर्माण करता येईल का? निश्चितच पद्धतीमागे सरावाचे सातत्य अभिप्रेत असते, एका विशिष्ट ध्येयासाठी, एका ठराविक दिशेने केलेली वाटचाल, ज्याचा उद्देश यांत्रिक सवय निर्माण करण्याचा असतो, आणि त्या यांत्रिक सवयीमधून यंत्रवत न झालेले असे मन साध्य करायचे असते.

जेव्हा तुम्ही 'शिस्त' असे म्हणता तेव्हा सर्व शिस्त एखाद्या साच्याप्रमाणे, एका पद्धतीवर आधारलेली असते आणि तो साचा तुम्हाला एका परिणामाची हमी देतो. जे परिणाम श्रद्धाळू मनाने अगोदरच निश्चित केलेले असते, स्वीकारलेले असते आणि असे मन अगोदरच एक भूमिका घेत असते. म्हणून एखादी पद्धत, त्या शब्दाच्या व्यापक किंवा संकुचित अर्थछटांनुसार नवीन मन निर्माण करेल काय? जर तसे नसेल तर पद्धत (method) एक सवय म्हणून पूर्णपणे नाकारली पाहिजे. कारण ती खोटी असते. पद्धतच मनाला त्याच्या अपेक्षित परिणामानुसार संस्कारित करते. मनाने विचाराच्या सर्व यांत्रिक प्रक्रिया टाकून दिल्या पाहिजेत. म्हणून पद्धती, प्रणाली, शिस्त, सवयीचे सातत्य ह्या सर्व गोष्टी नवीन मन निर्माण करतील ही कल्पना खोटी आहे. तेव्हा जे जे काही यांत्रिक असते, ते सर्व टाकून दिले पाहिजे. जे मन यांत्रिक असते ते पारंपरिक असते. ते प्रवाही, अयांत्रिक असलेल्या जीवनाला भिडू शकत नाही, सामोरे जाऊ शकत नाही. म्हणून पद्धती बाजूला काढली पाहिजे - सोडून दिली पाहिजे.

*The Book of Life : Daily Meditations with Krishnamurti,* Oct. 18

# सत्य शोधण्यासाठी इथूनच सुरुवात झाली पाहिजे

धर्मशील मनुष्य ईश्वराचा शोध घेत नाही. धर्मशील मनुष्य समाजाचे परिवर्तन करण्यासाठी धडपड करीत असतो - जो समाज तो स्वत:च असतो. जो असंख्य धार्मिक विधी करीत असतो तो धर्मशील मनुष्य नसतो. जो परंपरेचे पालन करीत असतो, जो मृतवत भूतकाळातील संस्कृतीमध्ये जगत असतो, गीता, बायबलवर सतत प्रवचने देत असतो, सतत मंत्र म्हणत असतो, किंवा संन्यास घेतो - तो धर्मशील मनुष्य नसतो. असा मनुष्य वस्तुस्थितीपासून पळ काढीत असतो.

धर्मशील मनुष्य समाजाला, म्हणजेच पर्यायाने स्वत:ला समजून घेण्यासाठी तळमळत असतो. तो समाजापासून निराळा नसतो. त्याच्या स्वत:मध्ये संपूर्ण, एकूण परिवर्तन घडवून आणणे म्हणजेच लोभ, मत्सर, महत्त्वाकांक्षा यांचा पूर्ण अंत होणे असते आणि म्हणून जरी तो त्या परिस्थितीमधूनच निर्माण झालेला असतो, जे अन्न तो खातो, जी पुस्तके तो वाचतो, ज्या सिनेमांना तो जातो, धार्मिक ठाम मते, श्रद्धा, कर्मकांडे आणि असेच इतर प्रकार धारण करतो त्यामधून निर्माण झालेला असतो, तरीही तो त्या परिस्थितीवर अवलंबून नसतो. तो जबाबदार असतो आणि म्हणून धर्मशील माणसाने स्वत:ला समजून घेतले पाहिजे. जो समाजामधून निष्पन्न झालेला असतो आणि तो समाज त्यानेच निर्माण केलेला असतो. म्हणून सत्य शोधण्यासाठी इथूनच सुरुवात झाली पाहिजे. मंदिरांमध्ये नव्हे, प्रतिमांमध्ये नव्हे, - जरी ती प्रतिमा हाताने किंवा मनाने चितारलेली असली तरीही. नाहीतर काहीतरी संपूर्ण, नवीन, नूतन अशी अवस्था तो कशी शोधून काढू शकेल?

*The Book of Life : Daily Meditations with Krishnamurti,* Dec. 8

## धर्मशील मन हे काळाचे गुलाम नसते

धर्मशील मनाला अधिकार नसतो. म्हणून धर्मशील मन हे अनुकरण करणारे नसते. तुम्ही असे सुद्धा पाहाल की धर्मशील मन हे काळामध्ये अडकत नाही. ते उत्क्रांति, विकास किंवा क्रमाक्रमाने विचार करीत नाही. – ते प्राण्यापासून आलेले मन असते. कारण मेंदूचा काही भाग हा प्राण्यापासून उत्क्रांत होत आलेला आहे. प्राण्यापासून विकसित झालेला, प्राण्यापासून उत्प्रेरित होत, ते अनुभव संग्रहित करीत विकसित झालेला आहे. तो मेंदू काळामध्येच कार्य करीत असतो. म्हणून धर्मशील मन कधीच उत्क्रांति किंवा विकासाच्या दृष्टीने विचार करीत नाही. ते नेहमी काळाच्या बाहेरच उडी घेत असते, विचार करीत असते. मला वाटते की, तुम्हाला हे समजेल, जे कदाचित तुम्हाला नवीन आणि चमत्कारिक वाटेल, कारण तात्काळ बदल (mutation) म्हणजे मला हेच अभिप्रेत आहे. बदलणारे मन, बदलणारा मेंदू हे नेहमीच ज्ञातापासून ज्ञाताकडे जात असतात. परंतु धर्मशील मन हे नेहमीच स्वत:ला ज्ञातापासून मुक्त करत असते. म्हणजे मग त्याला अज्ञाताचा अनुभव घेता येतो.

अज्ञात हे कालातीत असते आणि ज्ञात हे कालसापेक्ष असते आणि म्हणून जर तुम्ही ह्यामध्ये सखोलपणे लक्ष घातले तर तुम्ही पाहाल की धर्मशील मन हे काळाचे गुलाम नसते. जर त्या मनाला आपण महत्त्वाकांक्षी आहोत, मत्सरी आहोत, भित्रे आहोत ह्याची जाणीव झाली तर ते त्याबद्दल आदर्शाच्या दृष्टीने, बदल घडवून आणणे पुढे ढकलण्याच्या दृष्टीने विचार करीत नाही. तर ते त्याचा तात्काळ अंत करते, त्या क्षणी, आणि त्या शेवट करण्यामध्येच त्या असामान्य, तरल, संवेदनक्षम जगण्याची सुरुवात होते जी बंधमुक्त असते, मुक्त असते.

मद्रास १९६१, भाषण ८

## धर्मशील मन हे सर्जनशील मन असते

सर्जनशीलता ही कधीच शब्दातून व्यक्त करता येणार नाही. सर्जनशीलता हा शोध नसतो. विश्व हे शोध करून निर्माण झालेले नाही. म्हणून धर्मशील मन हे सर्जनशील मन असते. कारण जीवन म्हणजे काय हे त्याने जाणलेले असते आणि म्हणून त्या मनाने दैनंदिन जगण्याच्या शुद्रतेपासून स्वत:ला मुक्त केलेले असते. दैनंदिन अस्तित्व हे जगणे नसते. ते यातनामय झालेले आहे आणि जेव्हा या यातना थांबतात तेव्हाच जगणे सुरू होते. फक्त धर्मशील मनच अशा प्रकारे जगू शकते. म्हणून सर्व प्रकारच्या क्षुद्रतेपासून मुक्त असणे आणि जगणे – तो शोध नसतो; धर्मशील मन हे अमेय, जाणता न येणारे – अज्ञेय असे अंतरंगात येण्यासाठीचे द्वार असते.

मद्रास १९६१, भाषण ८

**Statement about ownership and other particulars of Antarlahari Newsletter**

**Form IV**

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | : | Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Rd., Malabar Hill, Mumbai - 400 006. |
| 2. Peridicity of Publication | : | Once in four months, (January, May, September) |
| 3. Printer's Name | : | Anand Limaye |
| Whether citizen of India | : | Yes |
| Address | : | India Printing Works, 42, G. D. Ambekar Marg, Wadala, Mumbai - 400 031. |
| 4. Publisher's Name | : | P. V. Dabholkar |
| Whether citizen of India | : | Yes |
| Address | : | Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Rd., Malabar Hill, Mumbai - 400 006. |
| 5. Editor's Name | : | Vasanti Padte |
| Address | : | Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Rd., Malabar Hill, Mumbai - 400 006. |
| 6. Name and address of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one percent of the total capital | : | Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Rd., Malabar Hill, Mumbai - 400 006. |

I, P. V. Dabholkar, hereby declare that the particulars given are true to the best of my knowedge and belief.

Sd
(P. V. Dabholkar)

'अंतरलहरी' ही वृत्तपत्रिका दर चार महिन्यांनी प्रसिद्ध होणारी पत्रिका आहे. कृष्णजींच्या शिकवणीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी कृष्णमूर्तींच्या साहित्याची मराठी भाषांतरे, त्यांच्या शिकवणीसंबंधी लेख, संस्थेच्या उपक्रमांची, अभ्यासकेंद्रांची तसेच पुस्तके वगैरेंची माहिती इ. ह्या पत्रिकेत प्रकाशित केली जाईल. आपल्याला ही पत्रिका घरपोच हवी असल्यास आमच्या मुंबई केंद्राच्या पत्त्यावर पत्र किंवा ई-मेल द्वारा कळवावे. कृपया आपले नाव, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी आणि ई-मेल ही माहिती कळवावी.

*Published in January, May, September*

Periodical

*Registered with The Registrar of Newspapers for India under No. MAHMAR/2008/25259*

*If undelivered please return to :*
**Krishnamurti Foundation India**
Mumbai Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road,
Malabar Hill, Mumbai - 400 006.
Tel.: (022) 2363 3856 Email : kfimumbai@gmail.com
Websites : www.kfionline.org, www.jkrishnamurti.org

*Published by P.V. Dabholkar on behalf of Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai-400 006. Printed by S.V. Limaye at India Printing Works, 42, G.D. Ambekar Marg, Wadala, Mumbai - 400 031. E-mail : indiaprintingworks@gmail.com ● Editor : Vasanti Padte*
*Designed by Eurythmic Designs, Rite-Print-Pak, Mumbai- 400 013. E-mail : info@Eurythmicdesigns.com*